महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

बुधवार ❖१५ जानेवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २०१ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्यातील सर्वच शाळांमध्ये सी बी एस सी अभ्यासक्रम

## शिक्षणमंत्र्यांची घोषणा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आलं. दरम्यान, या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही




महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत.शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही याबाबत माहिती दिली.

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी, सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. त्यामुळे, राज्यातील सरकारी व अनुदानित शाळांमध्ये सुधारणा करण्यावर पुढील १०० दिवसांत शासनाकडून जोर देण्यात येत असल्याचे दिसून येते. तसेच, केंद्रीय शिक्षण पद्धतीचा गरजेनुसार अवलंबही केला जाईल.

चालू वर्षात पहिलीच्या वर्गात सीबीएसई पॅटर्नचा विचार आपण करत आहोत, पुढच्या टप्प्यात सीबीएससी पॅटर्नच्या ज्या चांगल्या बाबी आहेत, त्या आपण शाळांमध्ये घेऊ, असे दादा भुसे यांनी म्हटलं. सन २०२६-२७ मध्ये सीबीएसई पॅटर्नचा वापर होईल, असेही शिक्षणमंत्र्यांनी म्हटलं.

राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे राष्ट्रगीतापाठोपाठ राज्यगीत होणं अनिवार्य असल्याचे मतही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केलं. राज्यातील अनेक शाळांमध्ये त्याची अंमल बजावणी होताना दिसत नाही. यापुढं राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत लावणं सक्तीचं असल्याचे भुसे म्हणाले. मराठी भाषा प्रत्येक शाळात शिकवणं सक्तीचं असल्याचेही भुसे यांनी म्हटले.

**मुख्यमंत्र्यांनी काय केल्या सूचना**

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये शिकविण्यावर भर द्यावा. शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना घडविणारे उत्कृष्ट शिक्षक ही मोठी संपत्ती आहे, त्यांचा इतरांसाठी आदर्श म्हणून उपयोग करा.

पूर्व प्राथमिक शिक्षणाची नोंदणी करून त्यांना कमीत कमी कोणत्या बाबी आवश्यक असाव्यात हे सांगून त्यांना प्रमाणपत्र द्या,पालकांचा विश्वास रहावा यासाठी हे प्रमाणपत्र त्यांनी दर्शनी भागात लावण्याची अट असावी.

समूह शाळा ही अतिशय महत्त्वपूर्ण आणि आवश्यक बाब आहे. तथापि, कमी संख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना समूह शाळांमुळे होणारे लाभ योग्य प्रकारे समजावून सांगा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# बदलापूरच्या खटल्याची जलदगतीने सुनावणी व्हावी

## उच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**

बदलापूर येथील चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या गुन्ह्याच्या खटल्याची जलद गतीने सुनावणी होऊन पीडित लहान असल्याने वेळीच न्याय मिळायला हवा, असे स्पष्ट करत न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने त्यादृष्टीने खबरदारी घेण्याचे निर्देश सरकारला दिले. बदलापूर येथील शाळेतील दोघा चिमुरड्यांवर शाळेच्या आवारातच झालेल्या लैंगिक अत्याचाराची घटना उघड झाल्यानंतर त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटत सर्वच स्तरातून यावर संताप व्यक्त करण्यात आला. शाळकरी मुली तसेच महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत सुमोटो जनहित याचिका दाखल करून घेतली. याचिकेवर न्या. रेवती मोहिते-डेरे आणि



न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी अत्याचाराच्या गुन्ह्याच्या तपासाची सद्यस्थिती खंडपीठाला दिली. या प्रकरणी चौकशी पूर्ण करून आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले असून लवकरच खटला चालवला जाईल, असेही ॲड. वेणेगावकर यांनी सांगितले. याची नोंद घेत खंडपीठाने प्रकरणाचा खटला जलदगतीने चालवण्याच्या दृष्टीने योग्य खबरदारी घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. पीडित मुली लहान असल्याने खटला जलदगतीने चालवावा लागेल, असे खंडपीठाने सुनावणीवेळी स्पष्ट केले. अत्याचारप्रकरणी पोलिसांनी अक्षय शिंदेला अटक केली होती. मात्र चौकशीसाठी तुरुंगातून नेले जात असताना पोलिसांशी झालेल्या चकमकीत अक्षय शिंदेला मारण्यात आले. एसआयटीने दाखल केले आरोपपत्र चौकशीसाठी महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) आरोपपत्र दाखल केले आहे.लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याच्या तरतुदींनुसार लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत तत्काळ न कळवल्याबद्दल परिचारिका, शाळेचे मुख्याध्यापक आणि व्यवस्थापनातील दोन सदस्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. आरोपपत्राची दखल घेत न्यायालयाने पोलीस आणि राज्य सरकारला खटल्याला गती देण्याचे निर्देश दिले.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या केंद्र प्रमुखांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील १४ केंद्र प्रमुखांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आले असून त्यातील ३ सेवानिवृत्त केंद्र प्रमुख यांना देखील लाभ मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली शिक्षकांना विविध लाभ देणे बाबत विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे.

शिक्षण प्राथमिक विभागातील केंद्र प्रमुख म्हणून एका पदावर १२ वर्ष सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी करत असल्याने शिक्षण विभागातील १४ केंद्र प्रमुख यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# फरार मारेकऱ्यांना पकडा - महेश गायकवाड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण पूर्वेतील भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी आपल्यावर गोळीबार केल्यानंतर वर्ष होत आले तरी अद्याप तीन मारेकऱ्यांना पोलीस पकडू शकले नाहीत. हे तीन फरार मारेकरी पोलिसांना शोधून देणाऱ्यास आपण स्वता २५ हजार रूपयांचे बक्षिस संबंधितांना देऊ, असे माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी मंगळवारी पत्रकारांसमोर जाहीर केले.

गेल्या वर्षी २ फेब्रुवारी रोजी आपल्यावर भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी हिललाईन पोलीस ठाण्यात गोळीबार केला. सहा गोळयांमध्ये आपण गंभीर जखमी झालो. याप्रकरणात एकूण सात जणांवर महेश गायकवाड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गणपत गायकवाड




यांच्यासह इतर सात जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. यामधील चार जण पोलिसांनी यापूर्वीच अटक केले आहेत. याप्रकरणात अद्याप तीन जण फरार आहेत. हे तिन्ही फरार मारेकरी जे नागरिक पोलिसांना शोधून, पकडून देतील त्यांना आपण २५ हजार रूपयांचे बक्षिस देऊ, असे महेश गायकवाड यांनी जाहीर केले आहे. याप्रकरणात माजी आमदार गणपत गायकवाड तळोजा कारागृहात आहेत. तीन जण अद्याप पकडले गेले नसताना याप्रकरणातील अटक मारेकऱ्यांना एक एक करून जामीन मंजूर करून घेण्याची श्रृखंला सुरू आहे. फरारी आरोपींना अशाच पध्दतीने जामीन मंजूर होण्याची शक्यता माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

मागील वर्षी दावडी येथील एका जमीन प्रकरणातून महेश गायकवाड आणि माजी आमदार गणपत गायकवाड यांच्यात वाद झाला. हे प्रकरण मिटविण्यासाठी दोन्ही गट हिललाईन पोलीस ठाण्यात एकत्र आले होते. दोन्ही गटाचे समर्थक यावेळी अधिक संख्येने हिल लाईन पोलीस ठाण्याबरोबर जमले होते. दोन्ही गटात जोरदार घोषणाबाजी हमरीतुमरी सुरू होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या दालनात अगोदर माजी नगरसेवक महेश गायकवाड आणि त्यांचे समर्थक बसले होते. त्यानंतर एक उत्सवी कार्यक्रम आटोपून गणपत गायकवाड पोलीस ठाण्यात समर्थकांसह हजर झाले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाण्याबाहेरील जमावाला शांत करण्यात व्यस्त असताना पोलीस ठाण्यातील दालनात अचानक माजी आमदार गणपत गायकवाड यांनी कमरेचे पिस्तुल काढून त्यामधून महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सहा गोळया झाड़ल्याचा अहवाल पोलिसांनी दिला होता. त्याप्रमाणे त्यांच्यावर ठाणे येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले. याप्रकरणात महेश यांच्या तक्रारीवरून एकूण सात जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. यामधील तीन जण अद्याप फरार आहेत.

# म्हसा येथे महायुतीचा मेळावा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी) :**

खांबलिंगेश्वर म्हसोबाच्या यात्रेला पौष पौर्णिमेला म्हणजे १३ जानेवारीला प्रारंभ झाला असून आज दुसर्या दिवशी मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट विद्यमान आमदार किसन कथोरे , माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटिल, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन दर्शन घेतले.तद्नंतर महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ताचा स्नेहभोजन मेळावा प्रमोद हिंदुराव यांच्या प्रमुख नियोजनाखाली घेण्यात आला.यावेळी प्रमोद




हिंदुराव तथा राष्ट्रवादी कांग्रेसच्या वतीने आमदार किसन कथोरेंचा विशेष सत्कार करण्यात आला. मेळाव्याला भाजपा जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाकी , शिवसेना नेते प्रकाश पाटील यांनी मार्गदर्शन करताना महायुती सरकारच्या योजना जनते पर्यंत घेऊन जाणार्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणूकी साठी तयारीला लागण्याचे आवाहन केले तर आमदार कथोरे यांनी महायुतीच्या सर्व कार्यकर्तांचे आभार मानुन अभिनंदन केले ,व जे आपल्या पासून दूर गेलेत त्यांना म्हसोबा सद्बुद्धी देओ असा टोळा लगावला.तर नेत्यांच्या निवडणुका झाल्यात आता स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे कार्यकर्ताच्या निवडणूका येतील तेव्हा एकमेकांना पायात पाय घालून खाली खेचू नका असा सूचक सल्ला दिला.कार्यकर्तांना मजबूत केल पाहिजे विकासाला आम्ही कुठेच कमी पडणार नाही. भविष्य उज्वलआहे. मुरबाड हे दळण वळणाचे मुख्य केंद्र होणार आहे. खांबलिंगेश्वर आपल्याला आशीर्वाद नक्की देईल तसेच प्रकाश पाटील हे लवकरच आमदार होतील यात शंका नाही असे सुतोवाच यावेळी आमदार कथोरे यांनी केले असून आपण अनेकांना हद्दपार केले असल्याचा टोळा लगावला. यावेळी व्यासपिठावर प्रकाश परांजपे, अरविंद मोरे,मारूती धिर्डे, अरूण पाटील, राजेश पाटील, भरत पाटील, उल्हास बांगर,नितीन मोहपे,कांतिलाल कंटे,चंद्रकांत बोस्टे ,दिनेश उघडे, यांच्यासह बदलापुर- मुरबाडचे आजी माजी नगरसेवक, माजी सभापती, जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य ,सरपंच व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558




## वाचकांचे पत्र

प्रति,
मकर संक्रांतिनिमित्त सर्व जीवनदीप वार्ता वृत्तपत्राच्या परिवाराला माझ्याकडून शुभेच्छा!
आपल्या स्थानिक वृत्तपत्रातील वृत्त विषय, लेख माहितीदायक तसेच वाचनीय असतो. तसेच विविध विषयांवर संपादकीय, विशेष लेख सुद्धा मी नियमित वाचतो. मला आपले वृत्तपत्र नियमित वाचायला आवडते. व मी नियमित माझ्या मित्र परिवाराला सुद्धा वाचावयास सांगतो. आपल्या पुढील वाटचालीसाठी माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा.

आपला वाचक
सुजय दीक्षित

## गीतासार



न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा । १-३२ ।

**अर्थ**

हे कृष्णा, मला तर विजयाची इच्छा नाही, राज्याची नाही की सुखांचीही नाही. हे गोविंदा, आम्हाला असे राज्य काय करायचे? अशा भोगांनी आणि जगण्याने तरी काय लाभ होणार आहे? । १-३२ ।

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ।
१-३३ ।

**अर्थ**

आम्हाला ज्यांच्यासाठी राज्य, भोग आणि सुखादी अपेक्षित आहेत, तेच हे सर्वजण संपत्तीची आणि जीविताची आशा सोडून युद्धात उभे ठाकले आहेत. ।१-३३ ।

**आरोग्य टिप्स**

## शरीराच्या स्वभावानुसार करा लसणाचे सेवन



**पित्त प्रकृती असलेल्यांसाठी:** ज्यांचा स्वभाव उष्ण आहे त्यांनी कच्चा लसूण खाऊ नये. अशा लोकांनी लसूण तुपात तळून सेवन करावे. हिवाळ्यात ३-४ कळ्या आणि उन्हाळ्यात २ कळ्या खाणे फायदेशीर आहे.

**कफ प्रकृती असलेल्यांसाठी:** जर तुम्हाला छातीत सर्दी आणि कफाची समस्या असेल तर दररोज रिकाम्या पोटी दोन पाकळ्या कच्च्या लसूणाच्या मधासह खा. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होईल आणि सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळेल.

**वात प्रकृती असलेल्यांसाठी:** जर तुम्हाला सांधेदुखी, गुडघेदुखी किंवा स्नायू कडक होत असतील तर कच्चा लसूण तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल. तसेच, भिजवलेल्या मेथीच्या दाण्यांसोबत कच्चा लसूण खाल्ल्याने लवकर आराम मिळतो.

# वीजनिर्मिती आणि संतुलन



**- अशोक पेंडसे**

अन्न, वस्त्र आणि निवारा यांबरोबरच वीज ही गोष्ट देखील आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग झालेली आहे. विजेच्या संदर्भामध्ये काही गोष्टी नमूद करता येतील. वीज ही ३६५ दिवस आणि अखंडित असली पाहिजे, विजनिर्मिती होत असताना पर्यावरणाचा ऱ्हास कमीत कमी झाला पाहिजे, आणि वीज ही सर्वांना परवडण्याजोगी असली पाहिजे, या अपेक्षा विजेबाबत बाळगता येतील. विजेच्या निर्मितीबाबत मतमतांतरे आहेत. पर्यावरणवाद्यांना सौर आणि पवन ऊर्जाच हवी आहे. अणुऊर्जा निर्मितीमध्ये फक्त धोकाच दिसतो, अशीही काही मंडळी आहेत. त्यात काही वीज ग्राहकांना वीज मोफतच हवी आहे! तर विजेबाबत असे वेगवेगळ्या प्रकारचे दबावगट आहेत. त्यांच्या आग्रहांनुसार, दबावांनुसार विजेबाबतच्या धोरणांमध्ये बदल होत असतो. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या विजनिर्मिती पद्धतींकडे साकल्याने पाहण्याची गरज आहे. अणुऊर्जा, सौरउर्जा आणि पवनउर्जा, कोळसा आणि गॅसपासून विजनिर्मिती आणि जलविद्युत अशा चार मार्गांनी प्रामुख्याने वीजनिर्मिती होते. या चारही मार्गांकडे अभ्यासपूर्ण आणि खुल्या नजरेने पाहण्याची निकड जाणवते.

अमेरिकेत थ्री माइल आयलंड, रशियात चेर्नोबिल, तर सन २०११मध्ये जपानमधील फुकुशिमा असे तीन ठिकाणी अपघात झालेले आहेत. पण अणुऊर्जा म्हटले की प्रत्येक वेळेला भारतातच नव्हे तर जगभरात फुकुशिमाचा अपघातच प्रामुख्याने पुढे केला जातो. त्याचेच स्मरण करून दिले जाते. भारतामध्ये सन १९६९पासून तारापूर येथे अणुऊर्जेवर वीज निर्माण केली जात आहे. तर फ्रान्समध्ये सन १९८०पासून ७० टक्क्यांपेक्षा जास्त वीज निर्मिती ही अणुऊर्जा माध्यमातून केली जात आहे. भारतातील तारापूर प्रकल्पाच्या कौतुकास्पद कामगिरीकडे आम्ही डोळेझाक करतो. जपानमध्ये फुकुशिमानंतर अणुऊर्जाआधारित वीज उत्पादन मोठ्या प्रमाणावर थांबवले गेले. ते थांबल्याने विजेची मागणी पूर्ण करणे अर्थातच शक्य नव्हते. त्यामुळे तेथील नागरिकांनी एअरकंडिशनर वापरणे थांबवले. त्यामुळे तेथील नागरिकांनी जवळपास दोन वर्षे कार्यालयांमध्ये जाताना कोट आणि टाय वापरणे थांबवले होते. मात्र, आता जपानने पुन्हा एकदा अणुऊर्जेच्या दिशेने आपली वाटचाल सुरू केली आहे. तैवानने देखील काही काळापूर्वी अणुऊर्जा निर्मिती कमी केल्यामुळे त्यांना सन २०२० आणि सन २०२२मध्ये विजेचे भारनियमन करावे लागले होते. जर्मनीमध्ये देखील अणुऊर्जा निर्मिती थांबवली आणि त्याऐवजी वायूपासून वीजनिर्मितीत वाढ केली. मात्र दीर्घ काळ सुरू असलेल्या युक्रेन युद्धामुळे जर्मनीला रशियाकडून गॅस मिळेनासा झाला. परिणामी विजेची किंमत दुप्पट झाली. आता परिस्थिती अशी आहे, की विजेच्या वाढलेल्या किमतीमुळे जर्मनीमध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंना जागतिक स्पर्धेत तोंड देणे कठीण झाले आहे. या देशांतील हे चित्र काय सांगते? तर, या देशांमधील स्थितीवर नजर टाकता आणि आपल्या तारापूरच्या प्रकल्पाकडे बघता आपण अणुऊर्जेबाबत सुज्ञपणे विचार करण्याची नितांत जरूर आहे.

पुढचा भाग म्हणजे सौर आणि पवनऊर्जा. या दोन्ही प्रकारच्या वीज निर्मितींमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होत नाही. तसेच सौर ऊर्जेची किंमत सुमारे २.५० ते २.८० रुपये, तर पवन ऊर्जेची किंमत सुमारे तीन रुपये आहे. या दोन्ही किमती सगळ्यांत कमी आहेत. भारतामध्ये सौरऊर्जा सुमारे एक लाख मेगावॅट आणि पवनऊर्जा सुमारे ५० हजार मेगावॅट एवढी प्रस्थापित क्षमता आलेली आहे. कोळशापासून विजेची स्थापित क्षमता सुमारे दोन लाख मेगावॅट आहे. संपूर्ण क्षमता ४ लाख मेगावॅटची आहे. म्हणजे ५० टक्के कोळशाची क्षमता आणि ३८ टक्के सौर आणि पवन ऊर्जेची स्थापित क्षमता. पण कोळशापासून सुमारे ७० ते ७५ टक्के वीजनिर्मिती होते, तर सौर अधिक पवनऊर्जा फक्त १३ टक्के इतकीच मिळते. सौरऊर्जा रोज सुमारे आठ तास आणि वर्षभरात २८० ते ३२० दिवसच मिळते. पवनऊर्जा महाराष्ट्रात फक्त चार महिन्यांतच मिळते. म्हणजे दिवसाचे २४ तास आणि वर्षाचे ३६५ दिवस यासाठी वीज साठविण्याची कृती करण्याची जरूरी आहे. वीज बॅटरीमध्ये साठवता येते; तसेच पम्प स्टोअरेज पद्धतीने साठविता येते. आठ-दहा दिवसांपूर्वी आलेल्या एका निविदेत आठ तास सौरऊर्जा अधिक चार तास बॅटरीची ऊर्जा याची किंमत सुमारे ३.६० रुपये आलेली आहे. मात्र, सौरनिर्मितीचे आठ तास वगळता सोळा तास बॅटरीत वीज साठवणे हे परवडण्याच्या पलीकडे आहे, हे येथे नमूद करणे गरजेचे आहे. म्हणजे २४ तासाच्या विजेसाठी सौरऊर्जेबरोबर वीजनिर्मितीसाठी इतर मार्गांची मदत घ्यावी लागेल.

कोळशापासून आणि गॅसपासून वीजनिर्मिती हा एक पर्याय आहे. कोळशापासून वीजनिर्मिती म्हटले, की नेहमीचा येणारा प्रश्न म्हणजे पर्यावरणाची हानी. वेगवेगळ्या नवीन उपकरणांच्या साह्याने पर्यावरणाची हानी कमीत कमी कशी होईल यासाठी सर्व उपाय केले जात आहेत. अर्थात हे कितीही केले तरीसुद्धा ते सौरऊर्जेप्रमाणे शून्यावर नेता येणार नाहीत, हे खरे. पण एक मुख्य लक्षात घेतले पाहिजे की, वीजनिर्मितीसाठी लागणारा कोळसा भारतात उपलब्ध आहे. कोळसा कमी पडण्याचे मुख्य कारण रेल्वेची अपुरी वहनक्षमता हे आहे. त्यामुळे काही वर्षे समुद्रमार्गे कोळसा आयात करून विजेची मागणी पुरी केली जाते. पण ही आयातसुद्धा पाच ते सहा टक्क्यांपर्यंत सीमित आहे. जवळजवळ ६० टक्के गॅस भारत आयात करतो. त्यामुळे गॅस पासून होणारी वीजनिर्मिती तुलनेत बऱ्यापैकी महाग पडते. केंद्र सरकारकडून हा अनुदानित गॅस देण्यात येतो. पण हा गॅस किती द्यायचा याला मर्यादा आहेत. अगदी चटकन समोर येणारी गोष्ट म्हणजे, महाराष्ट्रातील उरणचे वीजनिर्मिती केंद्र हे गॅसच्या अभावामुळे ३० ते ४० टक्क्यांपर्यतच चालते. संपूर्ण युरोप हा गॅससाठी रशियावर अवलंबून होता. युक्रेन युद्धामुळे त्या देशांत झालेले दुष्परिणाम आज जग बघतच आहे. त्यामुळे हातचा कोळसा सोडून गॅसच्या मागे किती जायचे, याचा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

वीजनिर्मितीचा आणखी एक मार्ग म्हणजे जलविद्युत. जलविद्युतमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होत नाही, तसेच अगदी १० ते १५ मिनिटांमध्ये वीजसंच पूर्ण क्षमतेला नेता येतो. पण जल विद्युतमध्ये जमीन संपादन करणे हा एक मोठा गहन विषय आहे. त्यामुळे जलविद्युत प्रकल्प पूर्ण होण्यात आठ-दहा वर्षे लागतात.

वीजनिर्मितीच्या या सर्व मार्गांकडे बघितल्यानंतर एक लक्षात येते की, सौर आणि पवनऊर्जा ही मोठ्या प्रमाणावर आली, तरी २४ तासाच्या विजेसाठी अणुऊर्जा आणि कोळशावरील विजेकडे आपल्याला जावे लागते. भविष्यात गॅसवर आपण किती अवलंबून राहायचे याचाही विचार करावा लागेल. जलविद्युतमध्ये लवकरात लवकर प्रकल्प यावेत, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. सर्वांत शेवटी, कुठच्याही दबावगटांच्या दबावांना बळी न पडता आपले धोरण आखणे जरूरीचे आहे, हे महत्त्वाचे.



# शुद्धतेचा प्रवास

**-प्रा.डॉ.म.सु.पगारे**

शुद्धतेचा प्रवास हा अधिक शुद्धतेने आणि विशुद्धतेने होत राहिला की तो ज्ञानमार्गावरती अधिष्ठित होऊ लागतो. ज्ञानमार्गाचे अधिष्ठान हे प्रज्ञेला आवाहक असते. त्यामुळे प्रज्ञेकडे होणारा प्रवास हा विशिष्ट प्रकारच्या शुद्धतेने होतो. तेव्हा ही शुद्धता कसली, असे प्रश्न ज्ञानमार्गक्रमणेत अप्रस्तुत ठरतात.

प्रज्ञेच्या आकलनासाठी, समजून घेण्यासाठी चित्ताची एकाग्रता किंवा चित्ताची शुद्धता आवश्यक आहे. विशुद्धतेच्या मार्गावरती प्रतिष्ठापित होणारे असते ते म्हणजे 'चित्त', म्हणजेच 'मन'. ते शुद्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहाणारी व्यक्ती शुद्धतेचा प्रवास करीत असते. त्यामुळे शुद्धतेचा प्रवास शुद्धतेकडे तसाच विशुद्धतेकडे होत जातो. विशुद्धतेकडचा प्रवास मनाला निर्मळ करणारा असतो. मनाची एकाग्रता साधली तरच प्रज्ञेचा प्रवाह निर्माण होतो आणि प्रज्ञेचा प्रवाह निर्माण झाला तर विशिष्ट प्रकारच्या शुद्धीच्या अनुषंगाने ज्ञानाचा प्रकाश अनुभूतीला येऊ शकतो. माणसाच्या मनातून क्लेशांची हकाल पट्टी करणे म्हणजे विशुद्धतेकडचा मार्ग अवलंबणे. क्लेशांची हकालपट्टी म्हणजे थोडक्यात जी काही जळमटे, कचरा, घाण मनामध्ये साचलेली असते; त्या अविवेकी कचऱ्याला बाजूला सारणे आणि त्यापासून निर्लिप्त होणे, म्हणजे शुद्धतेचा अनुभव घेणे होय. बुद्ध धम्मामध्ये विशुद्धतेला खूप महत्त्व आहे. मनाची विशुद्धता ही संस्कारसंपन्न व सक्षम बनविणारी असते. बुद्धीवादातील सत्य स्वरूपाचे निष्कर्ष बलवान बनविणारी असते. या विशुद्धतेतील एकाग्रता मनाच्या निर्मळतेसह अनेक नवनवीन अनुभूतीचे असंख्य प्रज्ञाकण अनुभवायला लावून अप्रूप, अद्भुत अकल्पनीय अशा सत्य स्वरूपाच्या वास्तवातील ज्ञानाला प्रगल्भ बनविणारी विशुद्धता प्रकटत जाते, दृश्यमान होत जाते. तिचे अस्तित्व जाणवायला लागते. त्यामुळे मनाला शुद्ध करणे, विशुद्ध करणे तसेच परिशुद्ध करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मनाला शुद्ध करण्यातून चांगल्या पद्धतीचे आचरण घडायला लागते आणि चांगल्या पद्धतीचे आचरण ही चांगली सद्वर्तनशील कार्यप्रणाली म्हणता येईल. खरे तर माणसाला किमान माणूस होणे आवश्यक आहे, असे जेव्हा आपण म्हणतो; त्यावेळेला माणसाला ज्ञान मार्गावरून प्रवाहित होता आले पाहिजे. तेव्हाच माणूस प्रज्ञेकडे सरकताना अकल्पनीय अशा 'आनंदाचे डोही आनंद तरंगे' या भावनेचा अनुभव घेवू शकतो!

## आजचे राशीभविष्य

**मेष**
मानसिक चुळबुळ कमी करावी. काही गोष्टी शांत राहून बघत रहा. तुमच्या बाबत गैरसमज वाढू शकतो. खर्चात वाढ संभवते.

**वृषभ**
आर्थिक नियोजनावर विचार कराल.नवीन काम अंगावर येऊ शकते. विद्यार्थी वर्ग खुश असेल. दिवस बऱ्यापैकी व्यस्त राहील.

**मिथुन**
कामे उरकताना दमछाक होऊ शकते. आपली क्षमता लक्षात घ्यावी. कामात सकारात्मक बदल संभवतात. नियोजनबद्ध कामे करा.

**कर्क**
एकाचवेळी अनेक कामे हाती घेऊ नका. मन स्थिर ठेऊन विचार करावा. चंचलतेवर मात करावी लागेल.आपल्या धाडसाचे फळ मिळेल.

**सिंह**
ग्रहमानाची साथ लाभेल. मनातील इच्छा पूर्ण होईल. मुलांबाबत आत्मविश्वास वाढेल. अपेक्षित उत्तर हाती येईल. लहान प्रवास घडेल.

**कन्या**
कामात अनुकूलता येईल. हातातील कामात यश येईल. दिवस फलदायी ठरेल. मानसिक स्वास्थ्य जपावे. इतरांना सढळ हाताने मदत कराल.

**तूळ**
नोकरदार वर्गाला दिवस चांगला जाईल. सहकारी वर्ग मदत करेल. वरिष्ठ तुमच्या कामावर खुश होतील.महत्त्वाच्या निर्णयावर पुनर्विचार करावा.

**वृश्चिक**
संभ्रमित गोष्टी पुढे ढकलाव्यात. दिवस संमिश्र राहील. हातातील काम यशस्वी होईल. बोलताना अतिरिक्त शब्दांचा वापर टाळावा.

**धनु**
घरातील कामात जास्तीत जास्त वेळ घालवाल. विद्यार्थ्यांनी संधीचे सोने करावे. ज्ञानात भर पडेल. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टी लक्ष वेधून घेतील.


**मकर**
तरुण वर्गाचे सहकार्य घ्याल.अति धाडस दाखवू नका. मोठी खरेदी विचारपूर्वक करावी . हातातील गोष्टी जपून ठेवा.

**कुंभ**
जुनी कामे आधी मार्गी लावावीत.आपले स्पष्टमत देताना विचार करा. फसवणुकीपासून सावध राहावे. बौद्धिक क्षमता वाढेल.

**मीन**
सारासार विचार करण्यावर भर द्यावा. घरगुती गैरसमज टाळावेत. काही खर्च अचानक सामोरे येतील. नातेवाईकांशी संपर्क होऊ शकेल.



# पक्ष्यांसाठी मांजा जीवघेणा



नायलॉनचा मांजा जीवघेणा ठरत असून, गेल्या चार वर्षांत मांजात अडकलेल्या १६० पक्ष्यांची सुटका करण्यात अग्निशामक दलाला यश आले आहे. मात्र, एका पक्ष्याला जीव गमवावा लागला.

बाजारात बंदी असतानादेखील दर वर्षी नायलॉन मांजाची विक्री होते. त्यामुळे पक्ष्यांना फास लागण्याच्या सर्वाधिक घटना घडतात. गेल्या चार वर्षांत १६० पक्ष्यांना अग्निशामक दलामुळे जीवदान मिळाले, तर एका पक्ष्याला प्राण गमवावा लागला. फास लागलेल्या पक्ष्यांमध्ये सर्वाधिक कबुतरे, त्या पाठोपाठ कावळ्यांची संख्या आहे. दलाच्या कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालून पक्ष्यांची सुटका करावी लागते. अनेक कर्मचारी कर्तव्य बजावत असताना जखमी झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. गेल्या चार वर्षांत अग्निशामक दलाने नायलॉन मांजाच्या फासातून १६० पक्ष्यांची सुटका केली आहे.

**५४ मीटर 'शिडी'चा वापर**

पक्षी झाडावर असलेल्या मांजामध्ये अडकतात. अशा ठिकाणी फांद्यावर जाणे कर्मचाऱ्यांना शक्य नसते. काही ठिकाणी मोठ्या काठीला विळा बांधून मांजा कापला जातो. मात्र, त्यातून पक्षी उंचावरून पडून मृत होण्याची शक्यता असते. त्यामुळे अग्निशामक दलाकडून ५४ मीटर उंच असलेल्या 'शिडी'चा वापर केला जातो.

**२३९ प्राण्यांची सुटका**

अग्निशामक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या चार वर्षांत २३९ प्राण्यांची सुटका केल्याची नोंद आहे. २०२३ मध्ये मांजामुळे दहा जनावरे दगावली. मागील चार वर्षांत सुटका केलेल्या पक्षी, प्राण्यांची संख्या

| वर्ष | पक्षी | प्राणी |
|---|---|---|
| २०२१ | ३२ | ६३ |
| २०२२ | ४० | ८० |
| २०२३ | ४४ | ४२ |
| २०२४ | ४४ | ५४ |
| एकूण | १६० | २३९ |

नायलॉन मांजाची विक्री, वापर करण्यास बंदी आहे. कोणी दुकानदार त्याची विक्री करीत असताना आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे. संबंधित दुकानदारावर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सांगितले.

# डोंबिवलीतील बेकायदा फलकांवर गुन्हे दाखल

## केडीएमसीकडून पाच हजार फलकांवर कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या परवानग्या न घेता डोंबिवली रेल्वे स्थानक भागात विविध प्रकारचे जाहिरात फलक लावून शहराचे आणि मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्या आस्थापना, जाहिरातधारकांविरुद्ध पालिकेच्या ग प्रभाग कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी मालमत्ता विरुपणास प्रतिबंध कायद्याने फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

अर्धवेळ नोकऱ्या तात्काळ उपलब्ध, दुकानात कामे करण्यासाठी तात्काळ कामगार पाहिजेत, विविध प्रकारचे खासगी शिकवणी वर्ग अशा अनेक जाहिराती पालिकेच्या परवानग्या न घेता पालिकेचे स्कायवॉक, विजेचे खांब, वर्दळींच्या रस्त्यांवर खासगी आस्थापनांकडून लावण्यात येत आहेत, असे ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांच्या निदर्शनास आले होते. साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी ग प्रभागातील फेरीवाला हटाव पथक प्रमुख अरूण जगताप यांना ग प्रभाग हद्दीत बेकायदा लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांची माहिती काढण्यास सांगितले. ज्या फलकांवर मोबाईल क्रमांक होते. अशा आस्थापनांची नावे, पत्ते शोधुन त्यांच्यावर पथक प्रमुख अरूण जगताप यांनी रामनगर पोलीस ठाण्यात मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायद्याने तक्रार केली.



पालिकेची परवानगी घेतल्याशिवाय कोणीही शहरात फलक लावू नयेत. पालिका हद्दीत तात्पुरत्या स्वरुपात फलक लावायचे असतील तर नागरिक, आस्थापना, राजकीय पक्षांनी प्रभाग क्षेत्र कार्यालयांमधून परवानगी घ्यावी.
**अतुल तावडे**
**उपायुक्त, अतिक्रमण**

पोलिसांनी बेकायदा फलक लावणाऱ्या तीन आस्थापनांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

कायमस्वरुपी नोकरीसाठी झटपट अर्ज करा, वित्तीय संस्थांमधून झटपट कर्ज मिळवा, एका फोनवर कॅश ऑन क्रेडिट घ्या, असे फलक डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील डॉ. रॉथ रस्ता, पाटकर रस्ता भागात लावण्यात आल्या होत्या. ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी सुरू केलेल्या या बेकायदा फलकांविरुद्धच्या गुन्हे दाखल कारवाईमुळे आस्थापनांमध्ये खळबळ उडाली आहे.

**फलकांवर कारवाई**
**कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत दहा प्रभाग हद्दीतील सुमारे पाच हजार फलक काढून टाकण्याची कारवाई पालिकेच्या प्रभागातील साहाय्यक आयुक्तांनी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये केली. या कारवाईत एक हजार ८५ भित्तीचित्र, दोन हजार ८६७ फलक, १९ भव्य फलक, २४६ विविध पक्षांचे झेंडे काढण्यात आले. बेकायदा फलक लावणाऱ्या फलकावर पत्ता, मोबाईल क्रमांक असलेल्या २७ आस्थापनांविरुद्ध पालिकेने मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायद्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

# ठाणे वाहतूक शाखेचं विभाजन?

## कोंडीवर मात करण्यासाठी ठाणे पोलिसांची निर्णय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरात दिवसेंदिवस नागरिकरणाबरोबरच वाहनांच्या संख्येत होणारी वाढ होत असल्याने शहरांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यात पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे वाहतूकीचे नियोजन आखून अंमलबजावणी करताना वाहतूक पोलिस उपायुक्तांची दमछाक होत आहे. यामुळेच वाहतूक शाखेचे विभाजन करून ठाणे, भिवंडी एक परिमंडळ तर, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ असे दुसरे परिमंडळ तयार करण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांनी तयार केला असून तो राज्य शासनाकडे पाठविलेला आहे. त्यास शासनाकडून हिरवा कंदिल मिळताच, वाहतूक शाखेच्या विभजनासह अतिरिक्त पोलिस बळ उपलब्ध होणार आहे.

ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासगनर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलिस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरांमध्ये ठाणे पोलिसांची पाच परिमंडळे आहेत. त्यामध्ये वागळे इस्टटे, ठाणे, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर यांचा समावेश आहे. या सर्वच ठिकाणी उपायुक्त दर्जाचे अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. याशिवाय, या परिमंडळाचे पश्चिम आणि पुर्व प्रादेशिक विभागात विभाजन करण्यात आलेले असून त्यामध्ये ठाणे आणि भिवंडी शहर हे पश्चिम तर, कल्याण ते बदलापूरपर्यंतची शहरे पुर्व पाश्चिम प्रादेशिक विभागात येतात. त्यासाठी अतिरिक्त आयुक्त दर्जाचे दोन अधिकारी नियुक्त आहेत. त्यांच्या अखत्यारीत पोलिस उपायुक्त परिमंडळाचे कामकाज पाहतात. शहरांमधील वाहतूकीचे नियोजन आखून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र वाहतूक विभाग आहे. वाहतूक पोलिस उपायुक्त दर्जाचा अधिकारी हे कामकाज पाहतो. त्याच्या अखत्यारीत संपूर्ण आयुक्तालय क्षेत्र येते. त्यामुळे त्यांच्यावर ठाण्यापासून ते बदलापूरपर्यंतच्या शहरातील वाहतूकीचे नियोजन करण्याची जबाबदारी आहे. परंतु ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरात दिवसेंदिवस नागरिकरणाबरोबरच वाहनांच्या संख्येत होणारी वाढ होत असल्याने शहरांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यात पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे वाहतूकीचे नियोजन आखून अंमलबजावणी करताना वाहतूक पोलिस उपायुक्तांची दमछाक होत आहे. ही बाब लक्षात घेऊन ठाणे पोलिसांनी वाहतूक शाखेचे विभाजन करून ठाणे, भिवंडी एक परिमंडळ तर, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ असे दुसरे परिमंडळ तयार करण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांनी तयार केला असून तो राज्य शासनाकडे पाठविलेला आहे.

# जखमी पक्षांच्या मदतीसाठी रेसक्यू हेल्पलाईन सुरु

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मांजामध्ये अडकून जखमी होणाऱ्या पक्ष्यांच्या मदतीसाठी 'रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वेल्फेअर' (रॉ) संस्थेतर्फे स्वतंत्र मदत क्रमांक (हेल्पलाइन क्रमांक) सुरू केली आहे. पक्ष्यांच्या बचाव कार्यासाठी एक रुग्णवाहिका, पशुवैद्यकीय डॉक्टर आणि स्वयंसेवकांचे पथक सज्ज करण्यात आले आहे.



मकरसंक्रांतीनिमित्त मंगळवार, १४ जानेवारी रोजी सर्वत्र पतंग उडवण्यात येतात. अनेक ठिकाणी पतंग उडवण्याची स्पर्धाही आयोजित करण्यात येते. दरवर्षी पतंग उडविण्याचा आनंद लुटत असताना मांजामुळे अनेक पक्षी जखमी होतात. यामध्ये काहींचा मृत्यूही होतो. मांजामुळे कापल्याने होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढत आहे. दरवर्षी अनेक कबुतरे, कावळे, घुबड, पोपट, घार आणि फुलपाखरे आदी त्यात बळी पडतात. या पार्श्वभूमीवर 'रॉ' संस्थेने बचावकार्य मोहीम हाती घेतली आहे. पतंगाचा मोह आवरावा व मांज्यामुळे जखमी पक्षी निदर्शनास आल्यास त्याला तात्काळ मदत करावी, तसेच जखमी पक्षी दिसल्यास 'रॉ' या स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सण साजरा करताना त्याचा दुसऱ्यांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे गरजेचे आहे, अशी विनंती पक्षीप्रेमी व स्वयंसेवी संस्थांनी केली आहे. त्यामुळे जखमी पक्षी आढळल्यास संस्थेच्या मदत क्रमांक ७६६६६८०२०२ वर संपर्क साधावा, अशी विनंती संस्थेतर्फे करण्यात आली केली.

# जोशी बेडेकर महाविद्यालयात सिंधू संस्कृतीचे दर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे -** सिंधु संस्कृतीच्या शोधाला १०० वर्षे पूर्ण होत आहे. या संस्कृतीचे शहरी नियोजन, संस्कृती, कला आणि वास्तुकला याविषयी अंतर्दृष्टी देणारा समृद्ध शैक्षणिक अनुभव आताच्या पिढीला मिळावा तसेच सिंधु संस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शन नागरिकांना घडावे या दृष्टीकोनातून ठाण्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालयात इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय कॅम्पसमध्ये सिंधु संस्कृतीचे प्रदर्शन उभारले आहे. यासाठी विद्यार्थ्यांना ज्येष्ठ कलाकार सदाशिव कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. हा सर्व प्रकल्प विद्यार्थ्यांनी अवघ्या महिनाभरात उभारला आहे.

शंभर वर्षापूर्वी हडप्पा, मोहेंजो-दारो,धोलाविरा आणि लोथल या स्थळांच्या उत्खननामध्ये जे सापडले. ते खरतरं ५ हजार वर्षापूर्वीचे होते. त्याकाळात कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध नसताना देखील प्रगत नगररचना आणि स्थापत्याची उत्तम उदाहरणे यात आढळून आली. घराची रचना, स्नानगृहे, विटांचे फलाट, संरक्षण भिंती, तटबंदी, इमारतीची रचना अशा अवशेषांचा समावेश होता. या सिंधु संस्कृतीचे बद्दल आजच्या पिढली माहिती मिळावी तसेच याचे दर्शन नागरिकांना व्हावे यासाठी प्राच्यविद्या अभ्यास संस्था आणि जोशी - बेडेकर कला, वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हडप्पा संस्कृतीच्या शोधाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने सिंधू-सरस्वती संस्कृतीवरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १३ ते १९ जानेवारी या कालावधीत ठाणेकरांसाठी सकाळी ११ ते सायंकाळी ७ यावेळेत खुले असणार आहे. डॉ. महेश बेडेकर यांच्या संकल्पनेतून हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हा प्रकल्प उभारण्यामध्ये २१ विद्यार्थ्यांचा समावेश होता. दररोज सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे सर्व विद्यार्थी या प्रकल्पासाठी काम करत होते.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**मुंबई :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी २५ टक्के प्रवेश प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली. दुर्बल वंचित घटकांतील बालकांना स्वंय अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळासह अन्य मंडळांच्या एकूण ३२७ शाळांमध्ये ६ हजार ५३ जागा उपलब्ध आहेत.

या प्रक्रियेतंर्गत पात्र शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळासाठी २५५ शाळांमध्ये ४ हजार ६८५ जागा असून इतर मंडळांसाठी ७२ शाळांमध्ये १ हजार ३६८ जागा आहेत. अशा एकूण ३२७ शाळांमधे ६ हजार ५३ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पालकांकडून १४ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज भरण्याची सुविधा https://student. maharashtra. gov.in/adm_portal/Users/rte_index_new या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्गाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी इच्छुक पालकांनी दिलेल्या कालावधीत आपल्या पाल्यांचे अर्ज भरावेत, असे आवाहन महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

पालकांनी अर्ज भरतांना विचारपूर्वक १० शाळांची निवड करावी. तसेच यापूर्वी आरटीई २५ टक्के अंतर्गत बालकांचा शाळेत प्रवेश घेतलेल्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन सोडत काढण्यासाठी दिवस निश्चित केला जाणार आहे, अशी माहिती महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

# आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या तात्काळ नियुक्त्या करा

## - सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

रायगड जिल्ह्यातील अवैध धंदे, लेडीज बार, मटका, जुगार याबाबत हरीश बेकावडे यांनी यापूर्वी फार मोठे आंदोलने करून सदरचे व्यवसाय व डान्सबार बंद केले होते. त्यावेळी स्वर्गीय आर. आर.पाटील (गृहमंत्री) व स्थानिक अधिकाऱ्यांनी चांगले सहकार्य व तत्परता दाखवली होती. मात्र आता पुन्हा त्याच गोष्टींचा सुळसुळाट सुरू झाला असून अधिकारी माहिती असून सुद्धा मूग घेऊन गप्प आहेत याबाबत शंका वाटते. त्यामुळे रायगड जिल्ह्यासाठी नवीन आयएएस दर्जाचे जिल्हाधिकारी व आयपीएस दर्जाचे पोलीस अधीक्षक यांची तात्काळ नियुक्ती करा अशी मागणी पेणचे सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना लेखी पत्र लिहून केली आहे.

सर्वच नियम धाब्यावर बसून डान्सबार मालकांनी हैदोस सुरू केला आहे. याबाबत २७/१२/२०२३ रोजी मंत्री महोदयांना व अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करून सुद्धा कोणतीही कारवाई झाली नाही ,उलट अवैध धंद्याचा सुळसुळाट सुरू ठेवला. मटका, जुगार, डान्सबार, ड्रग्स माफिया, बेकायदेशीर भंगार माफिया, रेव्ह



पार्टी, बलात्कार घटना, अपघात, खून, दरोडे, याचबरोबर कायदा सुव्यवस्था बिघडणे, व्यसनाधीनता व माती माफिया, वाळूमाफिया, उत्खनन माफिया, वन माफिया यांनी चालवलेला हैदोस रायगड जिल्ह्याला नामशेष करत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडात असे व्यवसाय चालू असताना त्याकडे दुर्लक्ष करणे आणि रायगड जिल्ह्यात अशा गोष्टी चालू असणे हे गंभीर नव्हे तर महाराष्ट्राला काळीमा फासणारी गोष्ट आहे. यातूनच भविष्यात गुंडगिरी निर्माण होऊन भविष्यात छोटे-मोठे परप्रांतीय 'आका' रायगड जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात निर्माण होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडात नको ती परिस्थिती निर्माण झाल्यास त्यास जबाबदार कोण ? याचाही महाराष्ट्र शासनाने विचार करावा आणि म्हणूनच अशा गोष्टींना तात्काळ बंदी घालण्यासाठी आयपीएस दर्जाचे पोलीस अधीक्षक रायगडसाठी तात्काळ नेमणे गरजेचे आहे.

एवढेच नव्हे तर रायगडच्या जिल्हाधिकारी यांच्या कारकिर्दीत रायगड जिल्हाधिकारी कार्यालय ते प्रांत कार्यालय, तहसील पासून तलाठी कार्यालयापर्यंत व जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाऱ्यात येणारे सर्वच विभागाची कार्यालये यामध्ये दलालांचा सुळसुळाट सुरू असताना कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. शिवाय जिल्ह्यात येणारे विविध प्रकल्प, कंपन्या यांनी स्थानिक शेतकरी, प्रकल्पग्रस्त यांच्यावर अन्याय चालू केला आहे याची दखल सुद्धा घेतली जात नाही. विविध प्रकारच्या परवानग्या स्थानिक पातळीपासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत राजरोसपणे दिल्या जातात व रान मोकळे केले जाते. यामुळे शेतकऱ्यांच्या, स्थानिकांच्या व प्रकल्पग्रस्तांच्या माथी दारिद्र्य असून सर्वच क्षेत्रातील अधिकारी गुंगीचे औषध घेऊन कामे करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, याची दखल घेणे गरजेचे आहे. मात्र आजपर्यंत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक रायगड यांच्या नेमणुका सत्ताधाऱ्यांनी करताना नेमका कोणता हेतू ठेवला होता ? हे आजही गुलदस्त्यात आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली असणारे व शासनाला महसूल देणारे विभाग नक्की कशा पद्धतीने महसूल गोळा करतात व कोणासाठी करतात हे जगजाहीर आहे. तरी रायगड जिल्ह्यासाठी सुद्धा सक्षम आयएएस दर्जाचे जिल्हाधिकारी तात्काळ नेमण्यात यावे ही लेखी मागणी बेकावडे यांनी केली आहे.

बेकावडे हे ३५ वर्षे सामाजिक काम करत असताना अनेक वाईट अनुभव आले. त्यातच सत्ताधिकारी नको त्या कलावंतांना, गुंड, अवैध व्यवसायदार माफिया, कॉन्ट्रॅक्टर, दलाल यांना स्वार्थापोटी कोणत्याही क्षणी कोणत्याही वेळी भेटीगाठी देतात याची ज्वलंत उदाहरणे आपण पाहत असतो. मात्र सामाजिक कार्यकर्त्यांनी फक्त आंदोलने, उपोषणे व पत्रव्यवहार करून जनतेची कामे करावी हीच माननीय मुख्यमंत्री व मंत्र्यांची तसेच अधिकाऱ्यांची इच्छा असते का? ही बाब प्रामुख्याने लक्षात घेणे गरजेचे आहे असेही शेवटी सामाजिक कार्यकर्ते बेकावडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यामुळेच रायगड जिल्ह्यासाठी नवीन आयएएस दर्जाचे जिल्हाधिकारी व आयपीएस दर्जाचे पोलीस अधीक्षक यांची तात्काळ नियुक्ती करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी लेखी पत्राद्वारे केली आहे.

# टाटा वीज वाहिनांच्या खाली सिडको वाहनतळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**नवी मुंबई :** बेलापूर येथील सिडको भवनाच्या इमारतीसमोरील मोकळी जागा टाटा पावर कंपनीची असून टाटा कंपनीच्या उच्च दाबाच्या तारांखाली सिडको मंडळ धोकादायक वाहनतळ चालवित आहे. सिडको भवनात काम करणारे कर्मचारी आणि अभ्यागतांची वाहने कुठे उभी करावीत, असा प्रश्न शहरांचे शिल्पकार अशी बिरुदावली लावणाऱ्या सिडको प्रशासनासमोर निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे बांधकामाच्या परवानगी इतरांना देताना कायद्याच्या पुस्तकावर बोट ठेऊन नियम दाखवून परवानगी देणारी सिडको स्वताच्या नियोजनात मात्र पळवाट शोधत असल्याचे या निमित्ताने दिसत आहे.

बेलापूर परिसरात येणाऱ्या दळणवळणाच्या नियोजनाचा विचार करुन सिडको भवन केंद्रस्थानी असावे यासाठी या भवनाची निर्माण येथे करण्यात आले. मात्र या भवनातील कर्मचारी, अधिकारी हे स्वता कधी मोटारीने कार्यालयात कामावर येतील असा कोणताही विचार त्यावेळच्या नियोजनकर्त्यांनी केला नसल्याने वाहनतळाचा हा गोंधळ उडाला आहे. सध्या सहव्यवस्थापकीय संचालक आणि इतर वर्ग एकमधील अधिकाऱ्यांची वाहने सुद्धा विजेच्या उच्चदाबाच्या वाहिनीतील बेकायदा वाहनतळावर पार्क केली जातात. याच बेकायदा वाहनतळावर मोटारी व्यवस्थित लावण्यासाठी सिडकोने येथे सुरक्षा रक्षक नेमले आहेत. तसेच वाहने व त्यातील वस्तूंची चोरी होऊ नये म्हणून येथे सिडको मंडळाने सीसीटिव्ही कॅमेरे बेकायदा लावले आहेत. याबाबत माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतल्यावर टाटा कंपनीने सिडको मंडळाला पत्र लिहून संबंधित जागा टाटा कंपनीच्या मालकीची असून ती मोकळी करावी, असे लेखी पत्र पाठविले आहे. या पत्रावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**सिडकोला नवीन इमारतीची गरज**

५४ वर्षे झालेल्या सिडकोला नवीन इमारतीची गरज आहे. वारंवार जुन्या इमारतीची डागडुजी केली जात आहे. त्यामुळे नवीन इमारत बांधल्यास त्यामध्ये मुबलक दालने, सभागृह, तीन मजली वाहनतळ अशी सोय करावी लागणार आहे. नवीन इमारत सिडकोने बांधावी असा प्रस्ताव यापूर्वी सिडकोच्या तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक व्ही. राधा यांनी मांडली होती. मात्र त्यावर नगरविकास विभागाने गांभीर्याने विचार केला गेला नाही. भविष्यातील सिडको भवनाची नवीन इमारत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशेजारी उलवे नोडजवळ असल्यास अटलसेतूमार्गे मुंबई व नवी मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी ती प्रशस्त उभारण्याचे त्या प्रस्तावात म्हटले होते. सिडको मंडळाचे अजूनही नैना प्रकल्प व इतर प्रकल्प उभारणीचे काम पनवेल, उरण तालुक्यात शिल्लक आहे. उलवे येथून अधिका-यांना मंत्रालय, सिडकोचे निर्मल भवनातील कार्यालय नजीक येऊ शकेल. बेलापूर येथील सिडको भवनासह वाहनतळाचा प्रश्न नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, कोकण भवन, केंद्रीय सरकारी कार्यालय (सीबीडी) या इमारतींमध्ये कर्मचारी व अभ्यांगतांना सुद्दा भेडसावत आहेत. या परिसरात रस्त्यावर वाहने उभी करावी लागत आहेत.

# सफाळे परिसरातील रेल्वे प्रवासी त्रस्त



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
सफाळे(प्रतिनिधी)

सफाळे / बलसाड गाडी हि सफाळे वरून मुंबईला दैनंदिन प्रवास करणारे यांना एकमेव सोइस्कर गाडी होती आणि आजही आहे. परंतु रेल्वे अधिकारी आणि बलसाड रेल्वे कंट्रोल यांच्या मनमानी कारभारामुळे करोना काळात एक्सप्रेसचा दर्जा देऊन दैनंदिन प्रवासी यांच्या वर आर्थिक कर लादला आहे, तो कायमस्वरूपी परंतु आता तर बलसाड गाडीचे डबल डेकर डबे काढून साधे डबे जोडल्याने सफाळे रेल्वे स्टेशनवरून प्रवासी, मुंबईला भाजीपाला नेऊन विक्री करणाऱ्या महिला, दुध वाले यांचे बलसाड गाडीत वाढत्या गर्दि मुळे चढतांना दमछाक होते.

या अनुषंगाने सफाळे स्टेशन मास्तर कार्यालयात जाऊन सफाळे रेल्वे स्टेशन मास्तरांना वलसाड डबलडेकर कोच सिंगल डेकर केल्यामुळे निर्माण झालेल्या विविध समस्याबद्दल, सफाळे रेल्वे स्टेशन कमिटीचे उपाध्यक्ष पंकज म्हात्रे, कार्यकारिणी सदस्य प्रशांत किणी तसेच रोज या गाडीने प्रवास करणारे दैनंदिन प्रवासी यांनी लेखी स्वरूपात निवेदन दिले. तसेच सफाळे रेल्वे स्थानकातील विविध समस्या आहेत. त्याबद्दल स्टेशन मास्तर यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली. यामुळे दैनंदिन प्रवासी यांच्या समस्या बद्दल समाधान कारक तोडगा निगणार का?

# राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र प्रथम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

नुकत्याच गुजरात गांधी नगर येथे एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन इंडिया ह्यांच्या विद्यमाने गुजरात एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट असोशिएशनने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धत आपल्या रायगडच्या खेळाडुंनी महाराष्ट्राच्या संघातुन खेळुन ४ गोल्ड मेडल आणी ४ सिलव्हर मेडल पटकावले हे सर्व खेळाडू रविंद्र म्हात्रे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली गुजरात येथील स्पर्धेत सहभागी झाले होते.ह्या स्पर्धेत यशस्वी झालेले रायगडचे खेळाडू कुमार रूद्रेश प्रथमेश पाटील गोल्ड मेडल व सिल्व्हर मेडल, कुमार मोहीत परशुराम कोठेकर गोल्ड मेडल, सिल्व्हर मेडल, कुमार गौरव गोरखनाथ म्हात्रे गोल्ड मेडल व सिल्व्हर मेडल, कुमार आर्यन निलेश म्हात्रे गोल्ड मेडल व सिल्व्हर मेडल संपादन करुन महाराष्ट्राबरोबर रायगड पेण चे पण नाव उंचावले खेळाडुनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन इंडियाचे चेअरमन व युनायटेडचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.ह्या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स फेडरेशन इंडियाचे अध्यक्ष सुरेश कोळी उपाध्यक्ष रविंद्र म्हात्रे तसेच गुजरात एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट असोशिएशनचे अध्यक्ष सुरेश परमार ,टेक्निकल डायरेक्टर संदीप माने तसेच महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंगचे सहउपाध्यक्ष अविनाश सर ह्यानी मोलाची कामगीरी करुन स्पर्धा यशस्वी केल्या.

## राजपत्रित अधिकाऱ्यांची बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी)

फेब्रुवारी १९८६ रोजी स्थापन झालेल्या राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने पूर्वनियोजन व इतर विषयांकरिता शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीकरिता महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार श्री.ग.दि. कुलथे यांची विशेष उपस्थिती लाभणार असून त्यांच्यासमवेत महासंघाचे इतर पदाधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत महासंघाच्या कल्याण केंद्रासाठीच्या निधी संकलनाच्या कामाचा आढावा, महासंघाचे कार्यसंस्कृती अभियान, जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन करणे, पगारात भागवा अभियानाची अधिक उत्स्फूर्तपणे अंमलबजावणी तसेच अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा होणार आहे. तरी सर्व पदाधिकारी, ठाणे जिल्हा समन्वय समिती व सर्व शासकीय विभागातील वर्ग १ व २ च्या राजपत्रित अधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजता समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, कोकण विभागाचे सहसचिव डॉ.अविनाश भागवत तसेच सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद शाळा देवळोली रंगोत्सवात राज्यात प्रथम



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी)

**NCERT,** नवी दिल्ली, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन व **SCERT,** महाराष्ट्र,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी राज्यस्तरीय रंगोत्सव कार्यक्रमाचे पुणे येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवळोली,तालुका अंबरनाथ ,जिल्हा ठाणे येथील मुख्याध्यापिका सौ. तृप्ती अमोल पेन्सलवार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसह आट्‌र्स इंटिग्रेशन विषयावर आधारित सादरीकरण केले .या सादरीकरणाबद्दल सौ. तृप्ती अमोल पेन्सलवार यांना उत्कृष्ट सादरीकरणासाठी सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र व सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ.आय पी नदाफ,उप संचालक,**SCERT,** महाराष्ट्र, श्री. सचिन चव्हाण,विषय विभाग प्रमुख,**SCERT,** महाराष्ट्र व इतर मान्यवर उपस्थित होते.

# तरूणांनी उद्योजक बनून नोकऱ्यांची संधी उपलब्ध करावी

## – सुधीर घागस

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :




व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या तारूणांनी शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत उद्योगाकडे वळून व्यवसायाबरोबरच बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. स्वामी विवेकानंद यांचीही हीच शिकवण होती असे विवेकानंद जयंती कार्यक्रम प्रसंगी भिवंडी आयटीआय शाखा येथे सुधीर घागस यांनी सांगितले.

संत कबीर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भिवंडी (भादवड) या संस्थेमध्ये दिनांक १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मिलिंद पळसुले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले तर रावसाहेब कुमावत आय एम सी कमिटी सदस्य हे ही यावेळी उपस्थित होते स्वामी विवेकानंदांच्या व राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या कार्याला उजाळा घागस व पळसुले तसेच कुमावत यांनी दिला. संस्थेच्या प्राचार्या सौ सीमा महाजन यांनी प्रस्ताव केले. सदरच्या कार्यक्रमासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा संस्थेत घेण्यात आलेल्या होत्या त्या स्पर्धांमध्ये बक्षीस मिळालेल्या प्रशिक्षणार्थींना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे गटनिदेशक राजू परपटे, शिल्प निदेशक विश्वनाथ पाटील, अनिल कदम, सौ रेवसकर व भांडारपाल भरत साबळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय जाधव यांनी केले.

## तीन रोड रोमियोंना विद्यार्थिनींनी दिला चोप

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याण पूर्वेतील १०० फुटी रोडवर भरदिवसा मुलींची छेड काढण्याचा प्रकार घडला आहे. टेम्पोमधून मुलींची छेड काढणाऱ्या तीन आरोपींना संबंधित विद्यार्थिनींनी धडा शिकवला. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांनीही आरोपींना चांगली अद्दल घडवली. रोशन शर्मा, कपिल जयस्वाल, आणि आशिष कुमार गौतम अशी या तिन्ही रोड रोमियोची नावे असून कल्याण कोळशेवाडी पोलिसांनी या तिघांना ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

## कल्याणच्या रेतीबंदर परिसरातील तबेल्याला भीषण आग



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याण पश्चिमेतील रेतीबंदर परिसरात फानूस धाब्यानजीक एका तबेलेल्यातील गवताच्या गंजीला सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना सोमवारी संध्याकाळी घडली. सुदैवाने या घटनेत कुठल्याही प्रकारची जिवित हानी झाली नाही.अग्निशमन दलाच्या बंबानी घटनास्थळी तातडीने पोहचत तब्बल दोन तासात अगीवर नियंत्रण आणित आग विझवली. यादरम्यान पत्रापडल्याने एक अग्निशमन जवान किरकोळ जखमी झाल्याची माहिती सूत्राकडून मिळाली.

## रखडलेली विभागीय केंद्रप्रमुख परीक्षा त्वरित घ्या

### शिक्षक महासंघाची मागणी



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

राज्यातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व शैक्षणिक प्रशासनाच्या सोयीसाठी केंद्रप्रमुख पदाची निर्मिती केली गेली परंतु राज्यातील बहुतांश पदे ही रिक्त असल्याने त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे यासाठी पदोन्नती व विभागीय परीक्षा या माध्यमातून ही पदे भरली जातील असे शासनाने जाहीर केले परंतु अद्याप जाहीर झालेली केंद्रप्रमुख विभागीय परीक्षा झालेली नाही यासंदर्भातील निवेदन देऊन केंद्रप्रमुख पदासंदर्भातील अधिसूचना अंतिम करून केंद्रप्रमुख भरती पूर्णत्वास नेणेबाबत आग्रहाची मागणी महासंघाच्या वतीने करणेत आली आहे..

निवेदनात म्हटले आहे की दिनांक ५/६/२०२३ या दिवशी ४६०० पदांसाठी केंद्रप्रमुख परीक्षा प्राथमिक शिक्षकांकरिता जाहीर झाली होती, सुमारे महिनाभरातच त्याचा पेपर होऊन केंद्रप्रमुख पदी नियुक्ती असा क्रांतिकारी निर्णय आपल्या शासनाने मागील कार्यकाळात घेतला होता. केंद्रप्रमुख पद हे पदोन्नतीने ५०% व विभागीय परीक्षेतून ५०% भरले जाईल, असा अतिशय चांगला निर्णय आपल्या शासनाने घेतला आहे, त्यानंतर काही तांत्रिक अडचण येऊन पेपर पुढे जाऊन दिनांक ०६ ऑगस्ट २०२३ रोजी आपल्या शासनाने केंद्रप्रमुख पदा संदर्भातील अधिसूचनेचा कच्चा मसुदा प्रकाशित केला व महिनाभर हरकतींसाठी वेळ ठेवला. त्यावर अनेक हरकती व सूचना ग्रामविकास विभागाला प्राप्त झाल्या असून अधिसूचना अंतिम टप्प्यात असल्याचे अधिकारी वर्गाकडून समजले. ही सूचना अंतिम झाल्यानंतर लगेचच परीक्षेचा मार्ग मोकळा होईल अशा आशेवर राज्यभरातील सुमारे लाखभर प्राथमिक शिक्षक प्रतीक्षेत आहेत.परीक्षेच्या तयारीसाठी फॉर्म भरला ,पुस्तके घेतली व महागडे क्लास लावून अभ्यास ही केला पण परीक्षा च न झाल्याने शिक्षकांच्या पदरी निराशा आली आहे.त्यामुळे आपण सदर गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन केंद्रप्रमुख पदाची अधिसूचना अंतिम करून सदरची परीक्षा लवकरात लवकर घेऊन राज्यभरातील फॉर्म भरलेल्या शिक्षकांना न्याय द्यावा अशी विनंती महासंघाच्या वतीने नामदार जयकुमार गोरे साहेब-ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य व शिक्षण मंत्री नामदार दादा भुसे यांना प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी केली आहे..

## नायलॉन मांजाप्रकरणी मुंबईत १९ गुन्हे

**मुंबई :** मकार संक्रातीत पतंग उडवण्यासाठी बेकायदा नायलॉन मांजा विरोधात मुंबई पोलिसांनी विशेष मोहिम राबवली. त्या मोहिमे अंतर्गत १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईदरम्यान ३५ हजार किंमतीचा नायलॉन मांजा व इतर सामग्री जप्त करण्यात आली आहे. व कारवाईत पोलिसांनी ३५ हजार ३५० रुपये किंमतीचा नायलॉन मांजा आणि संबंधित सामग्री जप्त केली. बेकायदेशीर व्यापारात सहभागी असलेल्या इतर आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

## भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे निवासी शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष निवासी शिबीर बापुजी देवस्थान-सावरसई येथे विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडले.

शिबीराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .सदानंद धारप, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे., डॉ. एस. एस. पितळे, प्रा. अंकुश भिसे, ॲड योगेश दिवेकर, सावरसई गावच्या सरपंच आरती पाटील आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी शिबीरार्थींना शुभेच्छा देताना शिबीरादरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करून प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभाग घेऊन स्वतःच्या क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न करावा,शिबीराचा आनंद घ्यावा, असे सांगितले. यावेळी प्राचार्यांनी **'NOT ME BUT YOU'** हे ब्रीदवाक्य कायम ध्यानात ठेवून समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. ॲड योगेश दिवेकर, श्री. पाटील यांनीही शिबीरार्थींना शुभेच्छा देत शिबीरासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे यांनी शिबीरार्थींना शिबिराचे नियम समजावून सांगत एकमेकांच्या सहकार्याने हसत खेळत शिबीर पार पाडण्याचे आवाहन केले.

'युवक व माझा भारत'या संकल्पनेवर आधारित यंदाच्या शिबीरांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्वयं कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन शिबीरांतर्गत करण्यात आले. यामध्ये आरोग्य तपासणी,विविध माहितीपर व्याख्याने, कार्यशाळा आदीचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरार्थींनी सावरसई आणि परिसरातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी पथनाट्याचे सादरीकरणही केले. १० जाने रोजी शिबिराचा समारोप सोहळा पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, खजिनदार संजय कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी शिबीरार्थींचे कौतुक करत सदैव स्वतःमधील समाजभान जागृत ठेवून समाजहितासाठी कटीबद्ध राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.यानंतर विद्यार्थ्यांनी कायम समाजहितासाठी प्रयत्नशील राहण्याची भावना व्यक्त केली. सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. माळवे, डॉ.लकडे,डॉ.पितळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## महनीय व्यक्तींचा दिनदर्शिकेच्या माध्यमातून गौरव

### भाजप अधिवेशनादरम्यान झाले प्रकाशन

### माजी आमदार नरेंद्र पवार - हेमा पवार यांच्या संकल्पनेतून दिनदर्शिकेची निर्मिती







दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता
शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याण नगरीने आतापर्यंत देशाला अनेक महनीय व्यक्ती दिल्या आहेत. मात्र काळाच्या ओघात या महनीय व्यक्ती लोकांच्या स्मृतीतून नामशेष होऊ नयेत यासाठी माजी आमदार नरेंद्र पवार आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमा नरेंद्र पवार यांनी राबवलेल्या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. या शहराप्रती असणारे दायित्व लक्षात घेत पवार दांपत्याने दिनदर्शिकेच्या माध्यमातून या महनीय व्यक्तींच्या कार्याला पुन्हा एकदा उजाळा दिला आहे.

शिर्डी येथे संपन्न झालेल्या भाजपच्या राज्यस्तरीय अधिवेशनादरम्यान भाजपच्या विविध मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते या अनोख्या दिनदर्शिकेचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले.कल्याण...ऐतिहासिक वारसा आणि पार्श्वभूमी लाभलेल्या महाराष्ट्रातील निवडक प्राचीन ठिकाणांपैकी एक ठिकाण. हिंदवी स्वराज्याची निर्मिती असो की देशाचा स्वातंत्र्यलढा, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्र असो की उद्योग - कला. या ऐतिहासिक कल्याण नगरीने नेहमीच विविध क्षेत्रातील अनेक रत्नं दिली आहेत. मात्र काळाच्या आणि वाढत्या नागरीकरणाच्या ओघात ही रत्नं काहीशी विस्मृतीच्या पडद्याआड जाण्याची भिती निर्माण झाली होती. आणि त्यातूनच मग दिनदर्शिकेच्या माध्यमातून या महनीय व्यक्ती, त्यांचे कार्य आणि आपल्या शहरासाठी असणारे योगदान लोकांच्या घराघरात पोहोचवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सांगितले.

या दिनदर्शिकेमध्ये पहिल्या भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, सामाजिक कार्यकर्ते शंकरराव झुंजारराव, प्रा. राम कापसे, भगवानराव जोशी, दत्तात्रय धोंडीबा कदम, शिल्पकार भाऊ साठे, कृष्णराव धुळप, माधवराव काणे, मूर्तिकार विठ्ठल ईश्वाद, भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य, सुप्रसिद्ध उद्योजक डी. पी. लोहार अर्थातच दत्तात्रय पांडुरंग पिंपळे अशा विविध क्षेत्रातील १२ विभूती आणि त्यांच्या कार्याची ओळख करून देण्यात आली आहे. ज्यातून या व्यक्तींच्या कार्याच्या पाऊलखुणा जपल्या जाण्यासोबतच नव्या पिढीलाही आपला हा वारसा माहिती होणार आहे.

या महनीय व्यक्तींनी आपापल्या कालखंडात केलेल्या भरीव कामगिरीची माहिती नव्या लोकांसमोर, नव्या पिढीसमोर जाणे आवश्यक होते. ज्या शहराने आपल्याला आज नाव दिले, ओळख दिली त्या शहराप्रती असणारे आपले दायित्व ओळखूनच आपण हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला अशी माहिती माजी आमदार नरेंद्र पवार आणि त्यांच्या पत्नी हेमा पवार यांनी दिली आहे. तसेच या महनीय व्यक्तींनी आपापल्या संबंधित क्षेत्रात केलेलं काम आणि त्यातून गाठलेली उंची कोणीही नाकारू शकणार नाही. त्यांच्या या भरीव योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीचा आमचा हा छोटासा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान शिर्डी येथे संपन्न झालेल्या भाजपच्या राज्यस्तरीय अधिवेशनादरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, नगविकास परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, माजी केंद्रीय मंत्री डॉ.भारतीताई पवार आदी मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते या अनोख्या दिनदर्शिकेचे नुकतेच प्रकाशनही करण्यात आले.




## ग्रामपंचायत किसळ-पारगाव मध्ये राजमाता जिजाऊ जयंती उत्सव संपन्न

दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता
मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

१२ जानेवारी २०२४ रोजी ग्रामपंचायत आणि ग्रामसंघ किसळ-पारगाव आणि पेसा समिती संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ जयंती उत्सव आयोजित करण्यात आला होता, या निमित्ताने सरपंच डॉ कविता वरे यांच्या हस्ते पारगाव येथील ठाकर वाडीचे नामकरण उद्घाटन, शोधिणी गट स्थापना व ग्रामसंघ कार्यालय उद्घाटन करण्यात आले. दुपारी १२ वाजता ठाकर वाडीचे नवीन नाव राजमाता वाडी असे करण्यात आले. दुपारी २ वाजता महाविद्यालय व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचा शोधिणी गट स्थापन करण्यात आला. दुपारी ३ वाजता ग्रामसंघ कार्यालय उद्घाटन करण्यात आले. राजमाता जिजाऊ क्रांती गीत गाऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमात युवती व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समारोपिय भाषणात सरपंच डॉ कविता वरे यांनी राजमाता जिजाऊ यांची महती विषद करताना सती न जाता महिलांना स्वराज्य लढ्यात भाग घेण्यासाठी उत्तेजन दिले. संपूर्ण संयोजन भारती पारधी (पेसा अध्यक्ष), निशा पारधी (पेसा मोबिलायझर), रत्ना पडवळ सिआरपी ( किसळ), सुनिता भालके सिआरपी ( पारगाव) यांनी केले.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप
वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी